# हिशोब

तुझा नी माझा, हिशोब जुना आहे
तुझ्याकडे काही मागणं थोडंच का गुन्हा आहे
हात पसरताना वाटली, ना लाज जिथे
परतफेडीची नाही, थोडीही आस येथे...
मिळाले मागितलेले काही, काही राहून गेले
जे जे योग्य तुला वाटले, सारे काही तू दिले...
आज उघड तुझी, हिशोबाची वही
बघ राहिले आहे का? त्यात देणे घेणे काही...
घ्यायचे असेल ते, आनंदाने घेऊन जा
द्यायचे असेल ते मुक्तपणे उधळून जा...
देणे घेणे हे आता, सगळेच मिटवून जा
शेवटचे एकदा मला, तुझ्या ऋणात ठेवून जा...



समार्थ